आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दु. ३.०० वाजता

१२ मार्च २०२४ - मंगळवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज गुजरातमधे अहमदाबाद इथून सुमारे ८५ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. यावेळी त्यांनी दहा नवीन वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यात अहमदाबाद- मुंबई सेंट्रल गाडीचा समावेश आहे. मुंबई सेंट्रल इथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमात सहभागी झाले. ही गाडी रविवार वगळता सर्व दिवस धावणार आहे. प्रधानमंत्र्यांनी यावेळी मालवाहतूकीसाठी समर्पित रेल्वेमार्गाच्या दोन खंडांचं उद्घाटनं केलं. यात पश्चिम रेल्वेच्या पालघर जिल्ह्यात येणाऱ्या न्यू घोलवड खंडाचा समावेश आहे. तसंच ५१ गतिशक्ती मल्टीमॉडल कार्गो टर्मिनल्स उद्घाटन त्यांनी केलं.  जालना जिल्ह्यातल्या दरेगाव शिवारात उभारण्यात आलेल्या 'गती शक्ती कार्गो टर्मिनल'चं लोकार्पणही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, आणि रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे उपस्थित होते. प्रधानमंत्र्यांनी दीड हजाराहून जास्त एक स्टेशन एक उत्पादन स्टॉलचं लोकार्पण केलं. यात विरार - डहाणू रेल्वे मार्गावर काही स्थानकांचा आणि वाशिम स्थानकाचा समावेश आहे. लातूर इथल्या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचं लोकार्पणही प्रधानमंत्र्यांनी केलं. या रेल्वे कोच फॅक्टरीमध्ये रेल्वे आणि मेट्रो कोच तसंच वंदेभारत रेल्वे गाड्यांची बांधणी होणार आहे. प्रधामंत्री नरेंद्र मोदी यांनी  आज राजस्थानात पोखरण इथं  भेट दिली. तिन्ही संरक्षण दलांच्या स्वदेशी क्षमतांची सांघिक प्रात्यक्षिकं सादर करणाऱ्या  भारत शक्ती कार्यक्रमाला ते उपस्थित होते.

**<><><><><><>**

राज्याचे पहिले मुख्यमंत्री दिवंगत यशवंतराव चव्हाण यांची जयंती आज साजरी होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्षा या त्यांच्या शासकीय निवासस्थानी चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला आणि अभिवादन केलं. तसंच, या निमित्तानं

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातारा जिल्ह्यात कराड इथं प्रीती संगमावरच्या यशवंतराव चव्हाणांच्या समाधीस्थळी त्यांच्या स्मृतीस अभिवादन केलं.

<><><><><><>

समाजसुधारणेची बीजं सर्वप्रथम महाराष्ट्रात रुजतात आणि पुढे त्यांचा वटवृक्ष होतो, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येणाऱ्या समाज भूषण पुरस्कारांचं आज सकाळी मुंबईत त्यांच्या हस्ते वितरण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. समाज कल्याण क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या राज्यातल्या व्यक्ती तसच संस्थांना हे पुरस्कार दरवर्षी देण्यात येतात. आजच्या समारंभात गेल्या चार वर्षातले मिळून एकूण ३९४ पुरस्कार वितरित झाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच इतर मान्यवर उपस्थित होते. या पुरस्कारांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार यांचा समावेश आहे.

<><><><><><>

बीड जिल्हा उद्योग परिषदेतर्फे आज बीडमध्ये आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेमध्ये ३५ उद्योगांसोबत सामंजस्य करार करण्यात आले आहेत . या करारांची एकूण किंमत ६५८ कोटी रुपये आहे. आजच्या परिषदेला नव उद्योजक, उद्योग संघटना प्रतिनिधी, तसंच शासकीय अधिकाऱ्यांसह एकूण ३०० प्रतिनिधी उपस्थित होते.

<><><><><><>

सार्वजनिक निवडणुकीसाठी महाविद्यालयीन शिक्षकांची विभागीय अधिकारी म्हणून नेमणूक करु नये, अशी मागणी 'मस्ट' या शिक्षक संघटनेनं केली आहे. राज्यातल्या महाविद्यालयांमधे अध्यापकांची ५० टक्के पदं रिक्त असून या नेमणुकीमुळे अध्यापकांना सुमारे ३ ते ४ महिने महाविद्यालायतलं कामकाज बाजूला ठेवावं लागेल, तसंच त्यांना शासकीय कामकाजाचं प्रशिक्षण दिलेलं नाही; म्हणून विभागीय अधिकारी म्हणून निवडणूक कर्तव्यावर घेऊ नये अशी विनंती संघटनेनं केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली आहे.

**<><><><><><>**

मुंबईतल्या सह्याद्री अतिथिगृह इथं २०२४ च्या खरीप हंगामामध्ये युरिया आणि डीएपी खताचा संरक्षित साठा करण्याच्या नियोजनासाठी आज बैठक आयोजित करण्यात आली होती. राज्यात खरीप हंगामात खताचा तुटवडा भासू नये यासाठी ही बैठक झाली. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी या संदर्भात काही सूचना केल्या. राज्यामध्ये खताचा संरक्षित साठा करण्यासाठी नोडल एजन्सींना खत साठवणूक, वाहतूक, जीएसटी सेवा शुल्क अशा आनुषंगिक खर्चासाठी एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीसाठी निधीची तरतूद करण्यात येणार आहे, असं ते यावेळी म्हणाले. संरक्षित साठा करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन आणि विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन या संस्थांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशा सूचना कृषिमंत्री मुंडे यांनी यावेळी दिल्या. या बैठकीसाठी कृषी विभागाचे विविध अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात आज तिसऱ्या दिवशी मुंबईनं विदर्भावर पावणेपाचशेपेक्षा जास्त धावांची आघाडी घेतली आहे. मुशीर खानची १३६ धावांची शतकी खेळी, श्रेयस अय्यर च्या ९५, आणि अजिंक्य रहाणेच्या ७३ धावांच्या बळावर मुंबईनं दुसऱ्या डावातली धावसंख्या साडेतीनशेच्या वर नेली आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबईच्या ६   बाद ३५७  धावा झाल्या होत्या.

//<><><><><><>//